महाराष्ट्र भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर साठी फर्निचर, संगणक व तदनुंषगिक साहित्य खरेदीस म्हणून प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. पूरक-२०१७/प्र.क्र.२१३/र-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक - ३१ मार्च, २०१८

पहावे: -१) उदयोग उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र८२/भाग-III /उदयोग ४ दि.१.१२.२०१६
२) महसूल वन वन विभाग शासन निर्णय क्र.आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/र-१, दि.२०.१२.२०१६
३) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१७/१८/कोषा.प्रशा-५,दि.२९.१.२०१८
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.२१३/र-१, दि.६.२.२०१८
५) निबंधक, महाराष्ट्र भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्रस्थापना प्राधिकरण, नागपूर यांचे पत्र क्र.आस्था/कार्याक्र१/२०१८/७३ ,दि.३.३.२०१८ चे पत्र

प्रस्तावना:

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना संबंधी काही वाद निर्माण झाल्यास त्याचे त्वरीत निरसन करण्यासाठी भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम ५१ नुसार भूमी संपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना नागपूर येथे करण्यात आली आहे. सदरचे प्राधिकरण हे नव्याने स्थापन झाले आहे. मा.मुंबई उच्च न्यायालय, यांनी रिट याचिका क्र.२३२०/२०१७ मध्ये दि.९.३.२०१८ रोजी प्राधिकरणाची स्थापना करुन पिठासीन अधिकाऱ्याच्या नियुक्तीसह कार्यान्वित करण्याबाबत निदेश दिलेले आहेत. सदरचे प्राधिकरण हे नवीन असल्यामुळे या प्राधिकरणाचे न्यायदान विषयक कामकाज प्रभाविपणे व कार्यक्षमरित्या पार पाडण्यासाठी अद्ययावत व सुसज्ज अशा पायाभूत सोईसुविधांसह प्राधिकरण तात्काळ कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्राधिकरणास मूलभूत सोईसुविधांसह इतर तदनुषंगिक सुविधा देणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदर प्राधिकरणाच्या कोर्ट हॉल व कार्यालयासाठी फर्निचर, संगणक व तदनुषंगिक साहित्य खरेदीस उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र८२/भाग-III /उदयोग -४ ,दि.१.१२.२०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची प्रसिध्द केलेल्या सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद ३.२.३ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणात पीठासीन अधिकारी, निबंधक व इतक कर्मचारी यांच्यासाठी आवश्यक असलेले टेबल, खुर्च्या, डायस तसेच प्राधिकरणाचे अभिलेख ठेवण्यासाठी लागणारे शेल्फ,कपाटे, पक्षकार व वकीलांकरिता बैठक व्यवस्था उपलब्ध करुन देण्याकरिता लागणारे बेंचेस इ. फर्निचर तात्काळ खरेदी करणे आवश्यक असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

अ.क्र.	फर्नीचरचे प्रकार व आकार	अधीक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे दर (जीएसटीसह)	नगांची संख्या	एकूण किंमत (जीएसटीसह)
१	न्यायालय डायस व डायस प्लेटफार्म तसेच डायस वरील कठडा साग (१२ x ४ x४०x१२x४)	८२६००/-	१	८२६००/-
२.	डायस वरील मोठा टेबल (६ x ३ x२.५)	४३६६६/-	१	४३६६६/-
३.	डायस वरील छोटा टेबल (६ x २.५ x२.५)	१३५७०/-	१	१३५७०/-
४.	डायस वरील खुर्ची-महाराज चेअर (जजेस चेअर)	१८८८०/-	१	१८८८०/-
५.	डायस समोरील ब्रॅकेट (६ x१.५x२.५)	५९००/-	१	५९००/-
६.	साग बेंच सिट सनटॉप कर्व बॅक साईज (६ x १.५ x२.५)	१५५७६/-	५	७७,८८०/-
७.	सनटॉप स्टुल साईज (१५ x १५ x२१)	३१८६/-	३	९५५८/-
८.	साग खूर्ची के टाईप सीट व बॅक केनिंग	५३१०/-	९	४७७९०/-
९	साग खूर्ची वुडन सीट व कर्व बॅक	५९००/-	४	२३६००/-
१०.	ऑफीसर्स खुर्ची कुशन सीट	९४४०/-	२	१८८८०/-
११.	प्लाय सनटॉप टेबल एल टाईप शेप (५ x ३ x२.५)	२३६००/-	६	१४१६००/-
१२.	पायदान (१८ x ९ x८)	१४१६/-	२	२८३२/-
१३.	लोखंडी कपाट (६ x ३ x१.५)	११२१०/-	६	६७२६०/-
१४	बुक सेल्फ लोखंडी (५ x ३ x१.५)	११८००/-	६	७०८००/-
			एकूण नग-४८	एकूण रक्कम रु. ६,२४,८१६/- (अक्षरी सहा लाख चोवीस हजार आठशे सोळा रु.फक्त)

प्राधिकरणाकरिता आवश्यक फर्नीचरचे उपरोक्त तक्यात नमूद केलेले ४८ नग हे अधीक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचेकडून उपरोक्त दरकरारानुसारच खरेदी करण्यात यावेत. जेणेकरुन तुलनात्मकदृष्टया कमी दराने उत्कृष्ट दर्जाचे व टिकाऊ साहित्य उपलब्ध होईल. उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र८२/भाग-III /उदयोग -४ ,दि.१.१२.२०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका मधील परिच्छेद क्रमांक ३.२.३ मध्ये नमूद केल्यानुसार फर्नीचरचे उपरोक्त तक्यात नमूद केलेले ४८ नग हे अधीक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे दर यांचेकडून उपरोक्त दरकरारानुसारच खरेदी करण्यात यावेत, या अटींवरच रुपये ६,२४,८१६/-(रुपये सहा लाख चोवीस हजार आठशे सोळा फक्त) एवढया खरेदीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. तसेच प्राधिकरणाकरिता ५ संगणक,३ प्रिंटर्स, १ झेरॉक्स मशीन व १ वॉटर कुलर हे दर करार मागवून तुलनात्मक दृष्टया कमी किंमत असलेल्या उत्पादकाकडून खरेदी करताना उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र८२/भाग-III /उदयोग -४ ,दि.१.१२.२०१६ अन्वये कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका यामध्ये परिच्छेद ३.२.३ येथे नमूद केल्यानुसार ५ संगणक,३ प्रिंटर्स, १ झेरॉक्स मशीन व १ वॉटर कुलर या ब्रॅडेड वस्तुची खरेदी किंमत ३.०० लाखापेक्षा जास्त असल्याने सदर ब्रॅडेड वस्तुंची खरेदी DGS & DS च्या दरकरारावर करण्यात यावी या अटीवरच सदर साहित्य खरेदीस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. खरेदी करताना प्रचलित नियम व अटींचे पालन करावे.

३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१७/१८/कोषा.प्रशा-५,दि.२९.१.२०१८ अन्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात दि. १ फेब्रुवारी २०१८ पासून खरेदीच्या प्रस्तावांना निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर निर्बंध परिच्छेद १ व २ मधील नमूद खरेदीसाठी शिथील करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.अनौसं-१९६/१८/कोषा प्रशा-५ दि.३०.३.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदरचा शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०३३११८११३१६३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2018.03.31 18:12:34 +05'30'

(द.शं.मुंजाळे)
कक्ष अधिकारी महसूल व वन विभाग

प्रत :

१) विभागीय आयुक्त् कार्यालय, नागपूर
२) निबंधक (तहसिलदार), भूमी संपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/लेखापरिक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
४) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
५) मा. अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक
६) वित्त विभाग (कार्यासन कोषा-५/व्यय-१०/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई
७) कार्यासन ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई
८) र-१ कार्यासन निवडनस्ती.